सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०१७–१८/८६८ दिनांक : १४/०५/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय : सन २०१७ ते २०१९ या तीन वर्षाच्या कालावधीत वृक्ष लागवड, संगोपन व देखभालीबाबत वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ : १. शासन परिपत्रक क्रमांक, संकीर्ण–२०१६/(प्र.क्र.१५१.२०१६)/आस्था.२ दिनांक २१.११.२०१६.

२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र.उशिसं/२०१७/वृक्षलागवड/ वृक्षारोपन/९३४२/मवि.१/६३८८ दिनांक २९.५.२०१७.

३. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. सावधि. २०१६/प्र.क्र.८०/फ.११ दिनांक १०.१०.२०१६

४. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र.ससं/उशि/पुवि/वृक्ष लागवड/२०१८/९९९, दिनांक १०.५.२०१८.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र. १ दिनांक २१.११.२०१६ च्या शासन परिपत्रकान्वये प्रत्येक प्रशासकीय विभागाने सन २०१७ ते २०१९ या वर्षाच्या कालावधीमध्ये ५० कोटी वृक्ष लागवड, संगोपन आणि देखभाल या कार्यक्रमांतर्गत वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करून अमंलबजावणी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्या अन्वये आपणास कळविण्यात येते की, या विभागांतर्गत असणाऱ्या विद्यापीठे व महाविद्यालयांसाठी सन २०१८ मध्ये पुणे जिल्हात एकूण १.०० लाख इतकी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ठ निर्धारित करण्यात आलेले आहे.

वन विभागाने विकसित केलेल्या जिओ टॅगिंग या संगणकीय प्रणलीद्वारे अक्षांश व रेखांश यासह रोपे लागवडीसाठी स्थळनिश्चिती आणि इतर कार्यवाही पूर्ण झाल्यावर खड्डे खोदणे, ते माती, खत, किटकनाशके यांनी भरून तयार ठेवण्याबाबतची कार्यवाही करावी व त्याबाबतचा ऑनलाईन अहवाल www.greenarmy.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद केल्यान्वये नियमितपणे व अचूकपणे भरण्यात यावा. सदरील माहिती भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास सामाजिक वनीकरण विभाग, पुणे (श्री. वैभव भालेराव, सहाय्यक वन संरक्षक भ्रमणध्वनी क्रमांक ९८५०४२४८२०) यांच्याशी संपर्क साधावा.

वृक्ष लागवड कार्यक्रम दिनांक १ जुलै ते ७ जुलै या सप्ताहात प्रत्यक्ष पर्जन्यमानाचा अंदाज घेऊन करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे. प्रत्यक्ष वृक्षारोपण आणि वृक्ष जगवण्याची यशस्वीतता याबाबत तांत्रिक सल्ला व आवश्यक तेथे मार्गदर्शनाकरिता वन व सामाजिक वनीकरण विभागांतर्गत स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क करावा. **वृक्ष रोपणानंतर रोपांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमाण ८० ते ९० टक्के राहण्यासाठी आतापासूनच पूर्वतयारी करण्यात यावी.** त्यासाठी महाविद्यालये / विद्यापीठे इत्यादीमधील विद्यार्थी, एन.सी.सी., स्काऊट गाईड व लोकप्रतिनिधी यांचा सहभाग घेण्यात यावा. वृक्षरोपणासाठी कमीतकमी दीड ते दोन वर्षे वयाची दर्जेदार व गुणवत्तापूर्ण रोपे आणि पाण्याची उपलब्धता, हवामान, भौगोलिक परिस्थितीशी अनुरूप शक्यतो स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात यावी. रोपे उपलब्ध करण्याकरिता वन विभाग/सामाजिक वनीकरण/महाराष्ट्र वन विकास मंडळ/ग्रामपंचायत स्तरावरील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत (मनरेगा) विकसीत रोपवाटीका/खाजगी रोपवाटीका येथून रोपांची उपलब्धता करून घेण्यात यावी.

वृक्ष लागवडीचा प्रत्यक्षदर्शी अंतिमत: संगोपन याबाबतची माहिती विवरणपत्र १ आणि २ मध्ये विहीत केलेल्या प्रपत्रामध्ये ३१ जुलै २०१८ पर्यंत या मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण) १७ डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, कॅम्प, पुणे ४११ ००१ या कार्यालयास सादर करण्यात यावी तसेच पुढील लिंकवर **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Gov/Institute joint scheme proposal Report– Tree Plantation Programe Report 2018-19)** या लिंकवर त्रैमासिक माहिती अपलोड करावी. याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे त्यानुसार आपण आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. याबाबत विद्यार्थी विकास अधिकारी, रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि महाविद्यालये, संस्थेतील इतर शिक्षकांनाही उपक्रमाच्या स्वरूपानुसार सहभागी करून घेऊन जबाबदारी निश्चित करावी. कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**

सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२७८३३, २६६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/वृक्ष लागवड/२०१८/999 दिनांक १०.५.२०१८

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
४. कुलसचिव, गोखले इन्स्टिटयुट ऑफ पॉलिटिक्स सायन्स, पुणे.
५. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, येरवडा, पुणे

विषय – **सन २०१७ ते २०१९ या तीन वर्षाच्या कालावधीत वृक्ष लागवड, संगोपन व देखभालीबाबत वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अमंलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ-** **१.** शासन परिपत्रक क्रमांक, संकीर्ण-२०१६/(प्र.क्र.१५१-२०१६)/आस्था-२ दिनांक २१.११.२०१६.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. उशिसं/२०१७/ वृक्षलागवड/वृक्षारोपन/९३४२/मवि-१/६३८८ दिनांक २९.५.२०१७.
३. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. सावनि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११ दिनांक १०.१०.२०१६.

उपरोक्त संदर्भ क्र. १ दिनांक २१.११.२०१६ च्या शासन परिपत्रकान्वये प्रत्येक प्रशासकीय विभागाने सन २०१७ ते २०१९ या ३ वर्षाच्या कालावधीमध्ये ५० कोटी वृक्ष लागवड, संगोपन आणि देखभाल या कार्यक्रमांतर्गत वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अमंलबजावणी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्या अन्वये आपणास कळविण्यात येते की, या विभागांतर्गत असणा-या विद्यापीठे व महाविद्यालयांसाठी सन २०१८ मध्ये पुणे जिल्हयात एकूण १.०० लाख इतकी वृक्ष लागवड करण्याचे उददीष्ठ निर्धारीत करण्यात आलेले आहे.

तरी आपल्या अधिनस्त असलेल्या अशासकीय अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित महाविद्यालये तसेच आपल्या विद्यापीठामध्ये एकूण १.०० लाख वृक्ष लागवडीचे मायक्रोप्लॅनिंग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यामार्फत करण्यात यावे.

वन विभागाने विकसित केलेल्या जिओ टॅगिंग या संगणकीय प्रणालीद्वारे अक्षांश व रेखांश यासह रोपे लागवडीसाठी स्थळनिश्चिती आणि इतर कार्यवाही पूर्ण झाल्यावर खडडे खोदणे, ते माती, खत,

किटकनाशके यांनी भरुन तयार ठेवण्याबाबतची कार्यवाही करावी व त्याबाबतचा ऑनलाईन अहवाल www.greenarmy.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद केल्यान्वये नियमितपणे व अचूकपणे भरण्यात यावा. सदरील माहिती भरतांना कांही तांत्रिक अडचण आल्यास सामाजिक वनीकरण विभाग, पुणे (श्री. वैभव भालेराव, सहाय्यक वन संरक्षक - भ्रमणध्वनी क्रमांक ९८५०४२४८२०) यांच्याशी संपर्क साधावा.

वृक्ष लागवड कार्यक्रम दिनांक १ जुलै ते ७ जुलै या सप्ताहात प्रत्यक्ष पर्जन्यमानाचा अंदाज घेऊन करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे. प्रत्यक्ष वृक्षारोपण आणि वृक्ष जगवण्याची यशस्वीतता याबाबत तांत्रिक सल्ला व आवश्यक तेथे मार्गदर्शनाकरिता वन व सामाजिक वनीकरण विभागांतर्गत स्थानिक अधिका-यांशी संपर्क करावा. **वृक्ष रोपणानंतर रोपांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के** राहण्यासाठी आतापासूनच पूर्वतयारी करण्यात यावी. त्यासाठी महाविद्यालये / विद्यापीठे इत्यादीमधील विद्यार्थी, एन.सी.सी., स्काऊट गाईड व लोकप्रतिनिधी यांचा सहभाग घेण्यात यावा. वृक्षारोपणासाठी कमीतकमी दीड ते दोन वर्षे वयाची दर्जेदार व गुणवत्तापूर्ण रोपे आणि पाण्याची उपलब्धता, हवामान, भौगोलिक परिस्थितीशी अनुरुप शक्यतो स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात यावी. रोपे उपलब्ध करण्याकरिता वन विभाग / सामाजिक वनीकरण / महाराष्ट्र वन विकास महामंडळ / ग्रामपंचायत स्तरावरील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत (मनरेगा) विकसीत रोपवाटीका / खाजगी रोपवाटीका येथून रोपांची उपलब्धता करुन घेण्यात यावी.

या कार्यक्रमांतर्गत होणारा खर्च मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा, तसेच आवश्यक तेथे सी.एस.आर. फंडातून तरतूद उपलब्ध करुन घेण्यात यावी. वृक्ष लागवडीचा प्रत्यक्षदर्शी अहवाल आणि अंतिमतः संगोपन **याबाबतची माहिती विवरणपत्र १ आणि २** मध्ये विहित केलेल्या **प्रपत्रामध्ये ३१ जुलै २०१८** पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

प्रत – १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.